सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ११० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ९ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## सर्वोच्च बलिदानासाठी अकोल्याच्या वीरपुत्राला मरणोत्तर 'कीर्ती चक्र'

### वीरमातेच्या अश्रूंचा बांध फुटला अन् राष्ट्रपतींनी मारली मिठी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ९अकोला :** जिल्ह्यातील मोरगाव भाकरे येथील रहिवासी तथा महार रेजिमेंटच्या पहिल्या बटालियन, राष्ट्रीय रायफल्सचे शिपाई प्रवीण प्रभाकर जंजाळ यांना काश्मीर खोऱ्यात दहशतवाद्यांविरुद्ध लढताना दाखविलेल्या अद्वितीय शौर्य आणि सर्वोच्च बलिदानासाठी मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान केले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी भावूक झालेल्या वीरमातेला राष्ट्रपतींनी 'प्रोटोकॉल' बाजूला ठेवून घट्ट मिठी मारली.





**शेवटच्या श्वासापर्यंत लढा; देश संरक्षणात वीरमरण**

६ जुलै २०२४ रोजी काश्मीर खोऱ्यात सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान शिपाई प्रवीण जंजाळ आपल्या तुकडीसह कार्यरत होते. मोहिमेदरम्यान काही संशयास्पद हालचाली निदर्शनास येताच त्यांनी तातडीने आपल्या सहकाऱ्यांना सतर्क केले. याचवेळी लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी पळून जाण्याच्या उद्देशाने अंधाधुंद गोळीबार सुरू केला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिपाई जंजाळ यांनी विलक्षण धैर्य, शौर्य आणि प्रसंगावधान दाखवत दहशतवाद्यांचा पाठलाग केला. स्वतःच्या अचूक गोळीबारातून त्यांनी दोन कुख्यात दहशतवाद्यांचा खात्मा केला. चकमकीदरम्यान त्यांच्या डोक्याला गोळी लागून ते गंभीर जखमी झाले होते. मात्र, गंभीर जखमी अवस्थेतही त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत लढा सुरू ठेवला आणि अखेर देशाच्या रक्षणासाठी वीरमरण पत्करले. अतुलनीय शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेसाठीच्या सर्वोच्च बलिदानाचा गौरव म्हणून भारत सरकारने प्रवीण जंजाळ यांना मरणोत्तर 'कीर्ती चक्र' जाहीर केले होते. पुरस्कार स्वीकारतांना आपला मुलगा गमावल्याचे दुःख आणि त्यांच्या शौर्याचा अभिमान, अशा भावनांमुळे वीरमातेच्या डोळ्यातून अश्रूंचा बांध फुटला. हा भावनिक क्षण पाहून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वीरमाता शालू जंजाळ यांना घट्ट मिठी मारली. त्यांचे अश्रू पुसले. यावेळी सर्वांचेच डोळे पाणावले होते.

**राष्ट्रपती भवनात 'रक्षा अलंकरण' सोहळा**

दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात विशेष 'रक्षा अलंकरण' सोहळा आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. शहीद जवान प्रवीण जंजाळ यांच्यावतीने त्यांच्या पत्नी श्यामबाला जंजाळ आणि आई शाहू प्रभाकर जंजाळ यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा प्रतिष्ठेचा पुरस्कार स्वीकारला. या सोहळ्यास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह तसेच अन्य केंद्रीय मंत्री, वरिष्ठ लष्करी अधिकारी उपस्थित होते.

## INDIA आघाडीत नवा राजकीय 'बॉम्ब'!

### उद्धव ठाकरेंची थेट मागणी; 'पंतप्रधानपदाचा चेहरा जाहीर करा, समन्वयकही ठरवा'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई** आगामी लोकसभा निवडणुकांच्या तयारीला लागलेल्या खछ्ख– आघाडीत नेतृत्वाच्या मुद्द्यावरून नवी चर्चा सुरू झाली आहे. विरोधी पक्षांच्या महत्त्वाच्या बैठकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आघाडीसमोर दोन महत्त्वाच्या मागण्या ठेवल्याची माहिती समोर आली आहे. खछ्ख– आघाडीने तातडीने एक सक्षम समन्वयक नियुक्त करावा आणि जनतेसमोर पंतप्रधानपदाचा चेहरा स्पष्ट करावा, अशी भूमिका ठाकरे यांनी मांडल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे. या भूमिकेमुळे विरोधी पक्षांच्या आघाडीत नेतृत्वाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून आगामी राजकीय रणनीतीवर त्याचे परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यांच्या मते, विविध विचारसरणीचे आणि वेगवेगळ्या राज्यांतील पक्ष एकत्र असताना त्यांच्यात समन्वय साधण्यासाठी एक प्रभावी नेतृत्व आवश्यक आहे. अन्यथा आघाडीचा संदेश जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.



**पंतप्रधानपदाच्या चेहऱ्याचा मुद्दा पुन्हा चर्चेत**

उद्धव ठाकरे यांनी बैठकीत सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा पंतप्रधानपदाच्या संभाव्य चेहऱ्याबाबत उपस्थित केल्याची माहिती आहे. भाजपकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखा स्पष्ट चेहरा आहे. त्याउलट खछ्ख– आघाडीमध्ये अद्याप नेतृत्वाबाबत स्पष्टता नसल्याची टीका सत्ताधारी पक्ष सातत्याने करत आहे. या पार्श्वभूमीवर जनतेसमोर जाण्यापूर्वी आघाडीने आपला नेता कोण, हे स्पष्ट करावे, अशी भूमिका ठाकरे यांनी मांडल्याचे समजते. राजकीय विश्लेषकांच्या मते, विरोधी पक्षांची एकजूट मजबूत ठेवण्यासाठी हा मुद्दा अत्यंत संवेदनशील आहे. कारण आघाडीतील अनेक प्रादेशिक पक्षांचे नेते स्वतः राष्ट्रीय पातळीवर प्रभावी भूमिका बजावत आहेत.

**आघाडी आहे, पण नेता कोण?**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपविरोधी पक्षांना एकत्र आणण्यासाठी खछ्ख– आघाडीची स्थापना करण्यात आली होती. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उद्धव ठाकरे गट), द्रमुक, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष यांच्यासह अनेक पक्ष या आघाडीचा भाग आहेत. मात्र, स्थापना होऊन अनेक महिने उलटल्यानंतरही आघाडीचा अधिकृत समन्वयक किंवा राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख चेहरा निश्चित करण्यात आलेला नाही. याच मुद्द्यावर उद्धव ठाकरे यांनी बैठकीत भाष्य केल्याचे सांगितले जात आहे.

## रवी राणा म्हणतात .... मलाही एकनाथ शिंदेंनी ऑफर दिली होती: पण मी स्वतः देवेंद्र फडणवीस यांचा एक निष्ठावान सैनिक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती–**एकनाथ शिंदे यांनी अनेकदा मला विदर्भाच्या दृष्टिकोनातून जिल्ह्याच्या दृष्टिकोनातून आणि त्यांच्या पक्षाच्यादृष्टीने शिवसेनेत येऊन काम करण्याची ऑफर दिली होती. पण मी आधीच सांगितलं की, मी स्वतः देवेंद्र फडणवीस यांचा एक निष्ठावान सैनिक म्हणून मी काम करत आहे. जिथपर्यंत राजकारणामध्ये देवेंद्र फडणीस आहेत, तिथपर्यंत त्यांच्यासोबत सुद्धा मी ताकदीने काम करेन,मी कुठेही जाणार नाही. मी एकनाथजी शिंदे, बच्चू कडू यांचे आभार मानतो.

नवनीत राणा यांना भारतीय जनता पक्षाकडून राज्यसभा मिळाली पाहिजे, असे अनेकांना वाटत होते. ती लोकांची इच्छा होती. ती जागा भारतीय जनता पक्षाला सुटावी ही देवेंद्र फडणवीस यांची इच्छा होती. नवनीत राणा यांची इच्छा होती, मी तसं सुनेत्रा पवार यांना सांगितलं होते. यासाठी देवेंद्र फडणवीस सुद्धा पॉझिटिव्ह होते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसकडून नवनीत राणा यांनी लढले पाहिजे, अशी अट त्यांनी टाकली होती, त्यामुळे त्यांनी दुसरा उमेदवार शोधला, असे रवी राणा यांनी स्पष्ट केले.



**माझ्या मंत्रिपदाचा निर्णय देवेंद्र फडणवीस घेतील: रवी राणा**

मला मंत्री बनवण्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस घेतील. मला मंत्री बनवलं काय नाही बनवलं काय मला त्याची पर्वा नाही. एक सक्षम नेतृत्व म्हणून देवेंद्र फडणवीस काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वात आम्ही काम करतो, विदर्भाचा आमदार मुख्यमंत्री आहे त्याचा आम्हाला गर्व आहे. जनतेची इच्छा आहे रवी राणा मंत्री झाले पाहिजे. या जिल्ह्यामध्ये बच्चू कडू, यशोमती ठाकूर,अनिल बोंडे, प्रवीण पोटे हे मंत्री झाले. मात्र, आता मुख्यमंत्री जो निर्णय घेईल तो मला मान्य राहील, असे रवी राणा यांनी सांगितले.

## नगरसेवकांना गोवा वारी, 'टूर प्लॅन' समोर; काँग्रेसच्या दाव्यानंतर अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर** विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. निवडणुकीत भाजपची मते फुटू नयेत (क्रॉसव्होटिंग रोखण्यासाठी) आणि पक्षाचे सर्व नगरसेवक एकसंघ राहावेत, यासाठी भाजपने तगडी तटबंदी उभारली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून भाजप नागपूर महानगरपालिकेतील आपल्या सर्व नगरसेवकांना तब्बल तीन दिवस गोव्याला नेणार असल्याची खात्रीशीर माहिती समोर आली आहे. नागपूरच्या स्थानिक राजकीय रणधुमाळी आणि दबावापासून दूर ठेवण्यासाठी या सर्व नगरसेवकांचा 'टूर प्लॅन' देखील निश्चित करण्यात आला आहे.विधान परिषद निवडणुकीच्या नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील लढत कमालीची चुरशीची ठरण्याची शक्यता आहे. भाजपचे अधिकृत उमेदवार डॉ. राजीव पोतदार आणि काँग्रेसचे अतुल लोंढे यांच्यात ही थेट लढत होत आहे. नागपूर महानगर पालिकेत भाजपचे स्पष्ट संख्याबळ असले, तरी काँग्रेस नेत्यांनी 'क्रॉसव्होटिंग' (मते फुटणार) होणार असल्याचा मोठा दावा केला आहे. काँग्रेसचा हा दावा खोडून काढण्यासाठी आणि आपले संख्याबळ एकसंघ ठेवण्यासाठी भाजपने 'मिशन नागपूर' अंतर्गत सर्व नगरसेवकांना नागपूरबाहेर नेण्याचा मोठा प्लॅन आखला आहे.



**सा असेल नगरसेवकांचा संपूर्ण 'टूर प्लॅन'**

मिळालेल्या माहितीनुसार, १० जूनपासून ते थेट मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजेच १७ जूनपर्यंत नगरसेवकांना नागपूरबाहेर ठेवले जाणार आहे.

१० जून: सर्व नगरसेवकांची रेल्वेने नागपुरातून मुंबईकडे रवानगी केली जाईल.

११ जून: मुंबईत पोहोचल्यानंतर तिथून सर्वजण गोव्यासाठी रवाना होतील.

११ ते १४ जून: तीन दिवस नगरसेवकांचा गोव्यात मुक्काम असेल.

१४ जून: गोव्याहून मुंबईत परतल्यानंतर सर्व नगरसेवक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतील.

१५ आणि १६ जून: मुंबईतील प्रसिद्ध रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे नगरसेवकांसाठी खास दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे (अभ्यासवर्ग) आयोजन करण्यात आले आहे.

१७ जून: रेल्वेने सर्व नगरसेवक नागपूरला परततील.

१८ जून: विधान परिषद निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान पार पडेल.प्रशिक्षण की 'कौन्सिलिंग'?

## ममतांना धक्का, आता तृणमूलच्या २० खासदारांनी दिला एनडीएला पाठिंबा, बंगाल विधानसभेनंतर आता संसदेपर्यंत बंडखोरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नवी दिल्ली–** तृणमूल काँग्रेसच्या २० खासदारांच्या पाठबळामुळे लोकसभेत आता राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) संख्याबळ ३१३ वर गेले आहे.परंतु तृणमूलच्या पाठिंब्याने शिंदेसेनेचे महत्त्व कमी होणार आहे. शिंदेसेनेचे ७ खासदार असून यापूर्वी पुरेशा संख्याबळाअभावी शिंदेसेनेचे दिल्लीतही राजकीय वजन होते. त्याचा लाभ त्यांना महाराष्ट्रातही होत होता.

शिंदेसेनेच्या पाठिंब्याशिवाय एनडीएचे संख्याबळ ३०७ असे मजबूत होते. त्याशिवाय गेल्या काही दिवसांपासून उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. विशेषतः देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेली भेट आणि मिलिंद नार्वेकर यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या हालचालींमुळे ठाकरे गटाच्या भविष्यातील रणनीतीबद्दल राजकीय निरीक्षकांमध्ये उत्सुकता आहे.



त्यात दिल्लीत सोमवारी पार पडलेल्या 'इंडिया' आघाडीच्या महत्त्वाच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी प्रत्यक्ष उपस्थिती टाळली. या घडामोडीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सडकून टीका केली आहे. पत्रकारांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, इंडिया आघाडीत सामील झाल्यानंतर पराभव निश्चित असल्याचे आता या नेत्यांना उमजले आहे. यामुळेच हे नेते बैठकींपासून लांब राहणे पसंत करत आहेत.

**लोकसभेतील संख्याबळ**
भाजपचे २४०
एनडीएचे २९३
तृणमूलच्या २० खासदारांसह एनडीए ३१३ होईल


प. बंगाल निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसचे (तृणमूल) संकट संसदेपर्यंत पोहोचले आहे. पक्षाच्या खासदार काकोली घोष दस्तीदार यांच्या नेतृत्वाखाली २० खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवून एनडीएला पाठिंबा देणार असल्याचे म्हटले आहे. लोकसभेत २८ तृणमूल खासदार आहेत. बंडखोर खासदारांनी केंद्रीय मंत्री आणि बंगाल भाजपचे प्रभारी भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी बैठकही घेतली. या घडामोडी अशा वेळी झाल्या आहेत, जेव्हा तृणमूल अध्यक्षा ममता बॅनर्जी विरोधी आघाडीच्या बैठकीसाठी दिल्लीत पोहोचल्या आहेत.

तृणमूलचे ज्येष्ठ राज्यसभा सदस्य सुखेंदु शेखर रॉय यांनी पक्ष आणि संसद दोन्हीतून राजीनामा दिला. त्यांनी पक्षात भ्रष्टाचार असल्याचा आरोप केला. त्यांचा राजीनामा राज्यसभा सभापतींनी स्वीकारला आहे.

## रक्त सांडू, पण शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही!

### कोल्हापुरात सतेज पाटील–राजू शेट्टींच्या नेतृत्वाखाली विराट जनआंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९कोल्हापूर** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाविरोधातील आंदोलन आता अधिक तीव्र होताना दिसत आहे. मंगळवारी कोल्हापुरात हजारो शेतकरी, महिला आणि विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढत प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला. आंदोलनात सहभागी झालेल्या महिलांनी आमचे रक्त सांडले तरी चालेल, पण शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही, असा आक्रमक निर्धार व्यक्त केला. मोर्चात काँग्रेस नेते सतेज पाटील, शेतकरी नेते राजू शेट्टी तसेच छत्रपती शाहू महाराज सहभागी झाल्याने आंदोलनाला मोठे राजकीय आणि सामाजिक बळ मिळाले. मोर्चात ग्रामीण भागातील महिलांची मोठी उपस्थिती होती. महामार्गासाठी जमीन संपादित झाल्यास कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात येईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. आंदोलनात सहभागी महिलांनी सांगितले की, शेती हीच आमची उपजीविका आहे. जमीन गेल्यानंतर मुलाबाळांचे शिक्षण, विवाह आणि भविष्यातील आर्थिक सुरक्षितता धोक्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प स्वीकारला जाणार नाही.



मोर्चादरम्यान बोलताना सतेज पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली. शेतकरी आणि स्थानिक नागरिकांना नको असलेला प्रकल्प जबरदस्तीने राबवू नये, असे ते म्हणाले. त्यांच्या मते, आधीच नागपूर–रत्नागिरी मार्गासारखे पर्याय उपलब्ध असताना नव्या महामार्गाची गरज काय, हा प्रश्न सरकारने स्पष्ट करावा. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील हजारो अल्पभूधारक शेतकरी या प्रकल्पामुळे भूमिहीन होण्याचा धोका असल्याचा दावा त्यांनी केला.

## १५ दिवसांत माफी मागा, अन्यथा...;

### आमदार संजय गायकवाडांना भाजप नेत्याकडून १०० कोटींची नोटीस, वाद चिघळला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९बुलढाणा–** आपल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे, कृत्यामुळे नेहमीच चर्चेत असलेल्या शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. कारण, आता महायुतीमधील मित्रपक्षाच्या नेत्यानेच त्यांना तब्बल १०० कोटींच्या अब्रु नुकसानीचा दावा ठोकत नोटीस बजावली आहे. काही दिवसांपूर्वी दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित पुस्तकाच्या प्रकाशकाला फोनवरुन शिवीगाळ केल्यानंतर राज्यभरातून त्यांच्याबद्दल संतप्त प्रतिक्रिया आल्या होत्या. त्यानंतर, पक्ष नेतृत्वानेही त्यांच्याबद्दल नाराजी व्यक्त करत सूचना केल्या होत्या. आता, बुलढाणा भाजप जिल्हाध्यक्षांनीच संजय गायकवाड यांना नोटीस बजावली आहे. तर, संजय गायकवाड यांच्यावर पॉक्सो, ॲट्रॉसिटी व मानवाधिकार उल्लंघन यांच्यासारखे गंभीर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी वकील असीम सरोदे यांनी केली आहे.



बुलढाण्यातील शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी गेल्या ०६ एप्रिल आणि १० एप्रिल रोजी पत्रकार परिषदेत बुलढाणा भाजपचे जिल्हाध्यक्ष व माजी आमदार विजयराज शिंदे यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले होते. त्यावरुन जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. आता, याप्रकरणी भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी वकील असीम सरोदे यांच्यामार्फत संजय गायकवाड यांना १०० कोटी रुपयांच्या अब्रू नुकसानीची नोटीस पाठवली आहे. शिवाय पंधरा दिवसात सार्वजनिकरित्या माफीही मागायला सांगितली आहे. दरम्यान, या नोटीसीसह वकील असीम सरोदे यांनी बुलढाणा पोलीस अधीक्षकांना पत्र लिहून संजय गायकवाड यांनी पोक्सो, ट्रॉसिटी आणि मानवाधिकार यांसारख्या कायद्यांचं उल्लंघन केल्याचं म्हटलं आहे.

## संपादकीय ......

# झुरळांच्या उपद्रवमूल्याची परीक्षा

*कॉक्रोच जनता पार्टीचे पहिले आंदोलन शनिवारी दिल्लीत जंतरमंतरवर पार पडले. या आंदोलनाला मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांनी पुरेशी प्रसिद्धी दिली नाही. हा आरोप योग्यच आहे. प्रचलित माध्यमांसाठी जोपर्यंत एखादी घटना, घडामोडीचे प्रेक्षक किंवा वाचकांच्या अनुषंगाने दर्शनी आणि सनसनाटी ठरत नाही, तोपर्यंत ते त्यांची दखल घेत नाहीत. वृत्तवाहिन्यांसाठी टीआरपी हा विषय महत्वाचा असतो. जोपर्यंत हे गणित जमत नाही, तोपर्यंत ते त्या घटनेकडे दुर्लक्ष करतात. वेगाने बदलत्या जगात बातमीचे मूल्य ठरवण्याची परिमाणे आधुनिक काळात कमालीची बदलल्याने या बदलाचा स्वीकार करण्यावाचून पर्याय नाही, परंतु 'कॉक्रोच'ने समाजमाध्यमांचे गणित आणि त्याचा लोकव्यवहारातील उपयोग योग्य पद्धतीने समजून घेतला आहे. ही 'पार्टी' प्रचलित अर्थाने कोण्या राजकीय विचारवंताने स्थापन केलेली नाही, हेच या पार्टीचे बलस्थान आहे. तशीही झुरळे उपद्रवीच मानली जातात, परंतु कोणत्याही वातावरणात, तापमानात स्वत:ला टिकवून जिवंत राहण्याची आणि आपली संख्या वाढवण्याची त्यांची क्षमता इतर प्राणी किटकांच्या तुलनेत खचितच अधिक असते, हे वास्तव केवळ जीवशास्त्रापुरते मर्यादित नाही. ते इथल्या समाज आणि राजकीय शास्त्रालाही लागू पडते.*

*जगाचा इतिहास बदलण्यासाठी कारण ठरलेल्या दोन ऐतिहासिक चुका आजही संदर्भ उदाहरण म्हणून वापरल्या जातात, पहिली रोम जळत असताना निरोचं फिडल वाजवणं आणि फ्रान्सची राणी मेरी अँटोनेट हिने गरिबांच्या दुर्दशेबद्दल बोलताना केलेले असंवेदनशील वक्तव्य, फ्रान्सच्या जनतेला भाकरी मिळत नसेल तर त्यांनी केक खावा, या वाक्यातून राणीने 'नाही रे' गटाचा संताप ओढवून घेतला होता. रोम जळत असताना निरो खरंच वाद्य वाजवण्यात गुंग झाला होता का? खरंच असं झालं होतं का? आणि राणीनंही असं असंवेदनशील वक्तव्य खरंच केलं होतं का? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे इतिहासाने वस्तुनिष्ठ पद्धतीने साधार दिलेली नाहीत. मात्र ही दोन्ही वक्तव्ये सत्तेच्या निर्ढावलेपणाची आणि असंवेदनशीलतेची उदाहरणे म्हणून जगमान्य झाली आपल्याकडे सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालाच्या सुनावणीवेळी सामान्य जनतेचा, विद्यार्थ्यांचा उल्लेख 'कॉक्रोच' असा खरंच केला गेला का? हा प्रश्न इथे अलहिदा ठरतो. संबंधितांना तसे म्हणायचे नसेलही कदाचित, परंतु त्यातून भारतीय विद्यार्थी आणि पर्यायाने जनता ही कमालीची किळसवाणी, दुर्लक्षित, उपद्रवी आणि सत्तेच्या चपलेखाली कायम चिरडली जाणारी झुरळं आहेत, असे सत्तेला वाटत असावे. सोशल मीडियावर लाखोंच्या संख्येने क्रॉक्रोचला मिळणार्या समर्थकांचा दुजोरा सत्ता तसेच विरोधकांनाही अडचणीचा ठरू शकतो. यात सत्तेपेक्षा विरोधकांना या 'झुरळांची' मोठी अडचण ठरणार आहे. सत्तेच्या विरोधात सामान्य जनतेचा आवाज बनणे विरोधकांना शक्य झाले नाही, तर ही पोकळी ही झुरळे एकत्र येऊन भरून काढतील. तसे झाले तर राजकारणापेक्षा एका सामाजिक चळवळीची ही सुरुवात ठरू शकते. 'कॉक्रोच'नेही राजकारणाला विरोध करताना देशातील सामाजिक मुद्दे विचारात घेतले आहेत. प्रस्थापित राजकीय नेते त्याकडे दुर्लक्ष करत आहेत, पण फार काळ त्यांना त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.*

*कॉक्रोच जनता पार्टी हा पारंपरिक अर्थाने निवडणूक लढवणारा राजकीय पक्ष नसल्याने तो अधिक अडचणीचा आहे. झुरळांनी ही चळवळ म्हणून घोषित केल्याने त्यांच्याशी थेट कुरघोडीचे, विकत घेण्याचे, ब्लॅकमेलिंगचे राजकारण खेळता येणार नाही. कॉक्रोचकडे सत्तेची गणिते नसल्याने त्यांच्यासाठी लढण्याचे सगळेच मैदान खुले आहे. त्यामुळेच सत्तेने या आंदोलनाची दखलच न घेण्याची खेळी खेळली आहे. 'दखल' घेऊन एखाद्या समूहशक्तीला मोठं होऊ द्यायचं नाही, अशी ही रणनीती आहे. त्यामुळेच सत्तेने अभिजीत दीपकेंना अटक केली नाही. माध्यमांनी या आंदोलनाची पुरेशी दखल घेतली नाही. सुरुवातीला या पक्षाला एक 'सोशल मीडिया मीम' किंवा 'ट्रेंड' म्हणून पाहिले जात होते. अवघ्या काही दिवसांत या पक्षाने इन्स्टाग्रामवर २ कोटींहून अधिक फॉलोअर्सचा टप्पा पार केला. मात्र जंतरमंतरवर या आंदोलनात केवळ काही हजार तरुण-तरुणी जमले होते. यावरून या पार्टीच्या यशापयशाचे मूल्यमापन होणार नाही. या आंदोलनाचे बलस्थान समाजमाध्यमांवरील समर्थन आहे. प्रत्यक्ष मैदानावर कृती कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे. समाज माध्यमांवरील सगळेच लोक मैदानात उतरत नाहीत. 'नीट'पेपरफुटीचा पहिलाच मोठा मुद्दा 'कॉक्रोच'च्या हाती लागला आहे. त्यातून थेट केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागितला आहे. त्यामुळे सरकारने झुरळांना नगण्य समजून खरंच बेदखल केले आहे की, या झुरळांसमोर ते बॅकफूटवर गेले आहे? याचे खरेखरे उत्तर पुढील काळात मिळेल.*

*नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे कॉक्रोच जनता पार्टीने बेरोजगारी आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात प्रत्यक्ष आंदोलन करून हे सिद्ध केले की, हा केवळ डिजिटल ट्रेंड नाही. त्यामुळे भविष्यात हा पक्ष रस्त्यावरील आंदोलनांच्या माध्यमातून तरुणांचा आवाज बनू शकतो. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांच्या म्हणण्यानुसार, कॉक्रोच जनता पार्टी निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्ष नाही. त्यांचा सध्या पारंपरिक राजकारणात उतरण्याचा किंवा निवडणूक लढवण्याचा कोणताही हेतू नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची चळवळ म्हणून सत्तेवर प्रभाव टाकणारा दबाव गट म्हणून 'कॉक्रोच' काम करेल. प्रत्यक्ष निवडणूक लढवण्यापेक्षा किंवा सत्तेत सहभागी होण्यापेक्षा हे जास्त परिणामकारक असल्याचे अभिजीत दीपके आणि त्यांच्या सहकारी कॉक्रोचेसनी ओळखले आहे. सत्ता आणि स्वाभिमान या दोहोंमधून कॉक्रोचने तूर्तास तरी स्वाभिमानच निवडला आहे. त्यामुळे आजपर्यंतच्या परंपरागत सत्ताधार्यांना ही दुर्लक्षित झुरळे उपद्रवीच ठरणार आहेत. सध्या या झुरळांच्या उपद्रवमूल्याची तीव्रता किती आहे, हे सत्ताधारी, विरोधक इतकेच नव्हे तर लोकप्रिय प्रसारमाध्यमे दूरून पाहत आहेत. म्हणूनच ते त्यांच्यापासून अंतर राखून असावेत. परीक्षेतील घोटाळा लावून धरणार्या कॉक्रोचच्या उपद्रवमूल्याची सध्या परीक्षा सुरू आहे. त्यात उत्तीर्ण होण्यासाठी त्यांना चिकाटीने काम करावे लागेल.*

# १४ जूनच्या एमपीएससी परीक्षेचे नियम आता कठोर

## परीक्षा केंद्रावर दीड तास आधी पोहचावे लागणार, पाऊस आणि वाहतूक कोंडीमुळे आयोगाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नुकत्याच झालेल्या नागरी सेवा पूर्व परीक्षेमध्ये एका दिवसात उत्तर तालिका जाहीर करण्याचा नवा रेकॉर्ड आयोगाने केला. त्यानंतर एमपीएससी एक धडाकेबाज निर्णय घेत आहे. रविवार १४ जून, २०२६ रोजी नियोजित महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर होणार आहे. या परीक्षेसाठी आयोगाने नियम कठोर केले आहेत. एमपीएससीच्या परीक्षाद्यायच्या असतील तर आता उमेदवारांना दीडतास आधी परीक्षा केंद्रावर जावे लागणार आहे.

**हे नियमही बघा-** महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षेकरीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या ३३ख२:// खरङ्गल' ली. ५. ल्ल संकेतस्थळावरील प्रवेशपात्र उमेदवारांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड



करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**असे आहेत कठोर निर्णय**

परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उद्भवू शकणाऱ्या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान दीड तास अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे तसेच, प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर परीक्षा कक्षातील स्वतः च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. परीक्षा कक्षातील अंतिम प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

**संकेतस्थळाला भेट द्या**

आयोगाच्या संकेत स्थळा वरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना, प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचना तसेच आयोगाच्या संकेतस्थळावरील गायडन्स ऑफ एक्झामिनेशन या सदराखाली उपलब्ध असलेल्या 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत आयोजित परीक्षांच्या वेळी उमेदवारांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना' यांचे उमेदवारांनी पालन करणे अनिवार्य आहे. आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे उल्लंघन करणा उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार ठराविक कालावधीसाठी अथवा कायमस्वरुपी प्रतिरोधनाची तसेच, प्रचलित नियम / कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

# शेतकरी म्हणतो, शेती नको, शहरात मजुरी केलेली बरी!

## ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

एरवी शेतीचा हंगाम झाल्यावर मजुरीसाठी शहरात जाणार्!या शेतमजूर व शेतकर्!यांची धाव पाहायला मिळते. मात्र, यंदा अल्पभूधारक शेतकर्!यांनी शेती आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्यामुळे व यंदा येणार्!या संभाव्य अल्पवृष्टीच्या अंदाजामुळे शेती मक्ता किंवा निम्मे बटाईने लावत शहराची कास धरल्याचे गंभीर वास्तव ग्रामीण भागातून पुढे येत आहे. ही ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरणारी स्थिती आहे. बि बियाणे, खते, औषधे व मजुरीचे दर दिवसेंदिवस वाढत असल्याने एकंदर शेतीसाठी लागणार्!या सर्वच खर्चात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. कौटुंबिक, शैक्षणिक व इतर वाढलेल्या खर्चामुळे



शेतकर्!यांची आर्थिक घडी पूर्णपणे कोलमडली आहे. शेतीचा उत्पादन व खर्च याचा ताळमेळ बसेनासा झाला आहे. प्रचंड हालअपेष्टा व मेहनत करूनही शेतकर्!यांच्या पदरात नैराश्याव्यतिरिक्त काहीही उरत नाही. आखाती युद्धामुळे यावर्षी खताच्या किमती गगणाला भिडल्या आहेत. पुढील टप्प्यात पिकांना ऐनवेळी लागणारे खत उपलब्ध होईल की नाही, ही शंका सध्या बळीराजाला सतावत आहे. दरवर्षी हंगाम संपल्यावर ग्रामीण भागातील मजुरांचे जथ्थे रोजगाराच्या शोधात शहराकडे धाव घेतात. ही तशी नित्याची बाब आहे. परंतु, यावर्षी ऐन मजुरीच्या व पेरणीच्या हंगामात अल्पभूधारक शेतकरी आपली जमीन मक्तूयाने किंवा निम्मे बटाईने इतरांना देत पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबई, पुणे यांसारख्या शहराकडे धाव घेत आहेत. मागील अडीच ते तीन महिन्यांपासून सातत्याने ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी व शेतमजुरांनी शहराची वाट धरली आहे. ही स्थिती अशीच राहिल्यास याचा मोठा परिणाम ग्रामीण तसेच शहरी अर्थव्यवस्थेवर होईल.

शेतमालाला हमीभाव द्या कर्जमाफीचा जीआर पाहून शेतकर्!यांची घोर निराशा झाली असून निकषांमुळे निम्म्याहून अधिक शेतकरी कर्जमाफीस अपात्र ठरणार, असे दिसत आहे. कर्जमाफीची अपेक्षा धरून असलेल्या शेतकर्!यांचा अपेक्षाभंग होणार, अशी स्थिती निर्माण झाली आहे. कर्जमाफीपेक्षा आमच्या शेतमालाला उत्पादन खर्च व नफा यानुसार हमीभाव द्यावा, अशी मागणी शेतकर्!यांकडून होत आहे. सद्यस्थितीत शेती नको रे मजुरी केलेली बरे, असे म्हणण्याची वेळ शेतकर्!यांवर आली आहे.

# डॉ. मोहना कुलकर्णी शुक्रवारी दूरदर्शनवर

## 'विवेकी व्यक्ती- विवेकी समाज' विषयावर 'हॅलो सह्याद्री'मध्ये नितीन भट साधणार संवाद



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती** आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून वैद्यकीय सेवेला विराम देऊन समुपदेशन कार्याचा वसा घेतलेल्या अमरावतीच्या प्रख्यात सायकोथेरपिस्ट डॉ. मोहना चंद्रशेखर कुलकर्णी यांची मुलाखत शुक्रवार (ता. १२) ला दुपारी १२ वाजता सह्याद्री वाहिनीवरील 'हॅलो सह्याद्री' या कार्यक्रमात प्रसारित होणार आहे. महाराष्ट्रातील नामवंत निवेदक नितीन भट त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. विवेकी व्यक्ती- विवेकी समाज असा चर्चेचा विषय असणार आहे.अमरावती शहरात २५ वर्ष वैद्यकीय क्षेत्रात काम केल्यानंतर डॉ. मोहना कुलकर्णी समुपदेशनाच्या क्षेत्राकडे वळल्या असून बालपण ते वृद्धत्व यादरम्यानच्या अनेक विषयांवर त्या समुपदेशन करतात. सुजाण पालकत्व, सकारात्मक विचार, मनाचं आरोग्य, तरुणाईतला विवेक, स्वसंवाद, विवाहपूर्व मार्गदर्शन आणि वैवाहिक सहजीवन, वृद्धापकाळात विवेकाची साथ आणि विवेकी समाजाच्या निर्मिती साठी गरजेचे घटक आदी महत्वाच्या विषयावर त्यांनी या मुलाखतीतून भाष्य केले आहे. 'अफेअर्स' या पुस्तकाच्या लेखिका असलेल्या डॉ. मोहना कुलकर्णी यांनी आपल्या पुस्तकातून मांडलेला विषयदेखील उलगडून सांगितला आहे. या कार्यक्रमाच्या निर्मात्या मीनल पाठराबे आहेत.

# पाणीपुरवठा योजनेवर चोरट्यांचा डल्ला शेंदूरजना बाजारचा पाणीपुरवठा प्रभावित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९शेंदूरजना बाजार**

शेंदूरजना बाजार येथील ग्रामपंचायत पाणीपुरवठा योजनेला अज्ञात चोरट्यांनी लक्ष करत दोन इलेक्ट्रिक मोटारी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे गावाच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. माहितीनुसार, शेंदूरजना बाजार गावासाठी भांबोरा शेतशिवारातील फॉरेस्ट बंदी परिसरात असलेल्या विहीर व बोरवेलमधून पाणीपुरवठा केला जातो. या ठिकाणी पाणीपुरवठा योजनेसाठी अतिरिक्त स्वरूपात दोन इलेक्ट्रिक मोटारी ठेवण्यात आल्या होत्या.

ग्रामपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी निलेश मेश्राम हे नेहमीप्रमाणे पाणी सुरू करण्यासाठी विहिरीवर गेले असता त्यांना मीटर हाऊसचे दार तुटलेल्या अवस्थेत दिसून आले. संशय आल्याने त्यांनी आत पाहणी केली असता तेथे ठेवण्यात आलेली केएसबी कंपनीची १० एचपी क्षमतेची मोटार तसेच टेक्समो कंपनीची ७.५ एचपी सबमर्सिबल पंप मोटार जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. या घटनेची माहिती तात्काळ



ग्रामपंचायतीच्या प्रशासक तथा सरपंच आशा किशोर चौधरी यांना देण्यात आली. त्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असता अज्ञात चोरट्यांनी दोन्ही मोटारी चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. यानंतर प्रशासक यांनी तिवसा पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे तिवसा पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. ग्रामीण भागातील सार्वजनिक मालमत्तेवर वाढत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला असून चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घेण्याची मागणी केली आहे.

# ५४७ ग्रा.पं.कडे अडकली कोट्यवधींची देयके

## प्रशासक सरपंचांना आर्थिक व्यवहाराचे बंधन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील ५४७ ग्रामपंचायतींची मुदत संपल्याने सरपंचांना प्रशासक नियुक्त केले आहे. मात्र, न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रशासकांना वीज, पाणी, स्वच्छता, आरोग्य व कर्मचाऱ्यांचे वेतन वगळता इतर आर्थिक व्यवहार करण्यास बंदी आहे. यामुळे कंत्राटदारांची कोट्यवधींची देयके अडकून पडली आहेत. जिल्ह्यातील जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ५४७ ग्रामपंचायतींवर सरपंचांना अधिसुचनेद्वारे प्रशासक नेमले होते.



तसेच विद्यमान ग्रामपंचायतींच्या कार्यकारिणीला प्रशासक समिती म्हणून मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायत स्तरावरील विविध फंडांचे खातेबदल प्रशासक, ग्रामपंचायत अधिकारी व कर्तव्य दिलेली आहेत. त्यानुसार ग्रामपंचायत स्तरावरील विविध फंडांचे खाते बदल प्रशासक, ग्रामपंचायत अधिकारी यांच्या नावे झालेली आहेत; परंतु दरम्यानच्या काळात उच्च न्यायालयाच्या खंडपीठामध्ये विविध जिल्ह्यांत याचिका दाखल केलेल्या आहेत. त्यासंदर्भात न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये प्रशासकाच्या स्वाक्षरीने कोणता खर्च करावा किंवा याबाबत संभ्रम निर्माण झाला असल्याचे पत्र जिल्हा परिषद सीईओंना पाच मे रोजी ग्रामसेवक युनियनचे जिल्हाध्यक्ष आशिष भागवत, प्रशांत टिंगणे व पदाधिकाऱ्यांना दिले होते.

प्रशासक असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या अमरावती ४६, भातकुली ३५, नांदगाव खंडेश्वर ५१, चांदूररेल्वे २९, धामणगावरेल्वे ५५, तिवसा २८, मोर्शी ३९, वरुड ४०, चांदूरबाजार ४१, अचलपूर ४३, अंजनगावसुर्जी ३४, दर्यापूर ४८, चिखलदरा २३, धारणी ३५. एकूण ५४७.

# इंडिपेंडेंट क्लबच्या ग्रीष्मकालीन फुटबॉल शिबिराचा समारोप

## खेळाडूंना प्रमाणपत्रे व पदकांचे वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती :**

इंडिपेंडेंट क्लब, अमरावती यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ४० दिवसीय ग्रीष्मकालीन फुटबॉल शिबिराचा समारोप रविवारी (७ जून) रोजी सायन्स कोअर फुटबॉल ग्राउंड येथे उत्साहात संपन्न झाला. या शिबिरात सहभागी झालेल्या ज्युनियर फुटबॉल खेळाडूंना फुटबॉलच्या विविध तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले.शिबिरादरम्यान फुटबॉल प्रशिक्षणासोबतच योगा, मेडिटेशन, फिटनेस आणि डायट प्लॅन यांसारख्या विषयांवर मार्गदर्शनपर सत्रे व सेमिनार आयोजित करण्यात आले होते.सदर शिबिरात ५० च्या वर मुला मुलींनी सहभाग घेतला होता या सर्व खेळाडूंना श्री. सुधीर जगताप, विक्की दाते, आकाश टाले, गौरी भलावी आणि अण्णा डाके यांनी प्रशिक्षण दिले.समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शिबिरार्थींना प्रमाणपत्रे व पदकांचे



वितरण करण्यात आले. तसेच योग, झुंबा आणि आहार व्यवस्थापन विषयांवर मार्गदर्शन केल्याबद्दल डॉ. अनीता चौधरी आणि प्राचार्या सपना मिश्रा यांचा क्लबतर्फे सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यावेळी इंडिपेंडेंट क्लबचे अध्यक्ष नंदकिशोर भागवत, अमरावती जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष अरुण जायसवाल, सचिव सुशील सुर्वे, क्लबचे कोषाध्यक्ष खोबरागडे सर, सचिव प्रलय वाघमारे, प्रा. जे. के. चौधरी, विनोद पछेल, विनोद मिश्रा, संजय प्रधान, पन्ना वाघमारे आणि व्यास सर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अण्णा डाके यांनी केले. शिबिरामुळे युवा खेळाडूंमध्ये फुटबॉलबाबतची आवड, शारीरिक तंदुरुस्ती आणि शिस्तीची जाणीव अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# फडणवीस दिल्लीला जाणार असल्याच्या चर्चामध्ये कोणतेही तथ्य नाही- बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती-** शिवसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी एकनाथ शिंदेंच्या मुख्यमंत्री होण्याबाबत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीला जाणार असल्याच्या मुद्यावर भाष्य केले. यामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. मात्र यावरून आता भाजपचे नेते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी कडू यांनी चांगलेच सुनावले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीला जाणार हा निर्णय घेण्याचा अधिकार कुणाला नाही. त्यामुळे गावागावांमध्ये असे खडे फोडू नये. तसेच प्रत्येकालाआपला नेता मुख्यमंत्री व्हावा असे वाटते. पण म्हणून महायुतीच्या समन्वय समितीने ठरवलेल्या नियमांचे उल्लंघन करू नये. आपल्या नेत्याला विचारून आपल्या भूमिका मांडाव्यात. अन्यथा त्यावर विचार करावा लागेल.



पुढे बोलतांना चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, देवेंद्र फडणवीस दिल्लीला जावेत की नाही, याचा निर्णय घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. ते म्हणाले, महायुतीला जनतेने ५१ टक्क्यांहून अधिक मतांसह स्पष्ट बहुमत दिले आहे. हे राज्यातील सर्वात मजबूत सरकार आहे. आम्ही एकत्र आहोत. देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्राचा संकल्प केला असून राज्याला देशातील अग्रगण्य राज्य बनवण्याचे त्यांचे लक्ष्य आहे. फडणवीस दिल्लीला जाणार असल्याच्या चर्चामध्ये कोणतेही तथ्य नसल्याचा स्पष्ट संदेश त्यांनी दिला-

# हजारो लाडक्या बहिणींचे अर्ज जळून खाक



## नांदगाव खंडेश्वर येथील एकात्मिक बालविकास विभागाच्या कार्यालयाला भीषण आग

नांदगाव खंडेश्वर

येथील पंचायत समिती कार्यालय परिसरात असलेल्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना अर्थात आयसीडीएस विभागाच्या कार्यालयाला सोमवारी दुपारी २ वाजता भीषण आग लागली. आगीत कार्यालयातील सर्व कागदपत्रे, बेबी किड्स, सर्विस रजिस्टर, लाकडी फर्निचर, लाकडी कपाट, विशेषतः लाडकी बहिणीचे हजारो अर्जसुद्धा जळून खाक झाले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दल व स्थानिकांच्या अथक प्रयत्नानंतर सुमारे एका तासाने आग आटोक्यात आली.



कामकाजाकरिता तीन दिवसांअगोदर जागा उपलब्ध झाली. घर मालकांनी आम्हाला घराची चावी दिली व सोमवारी दुपारी १ वाजेपर्यंत काही साहित्य शिफ्टिंग केले. दुपारी नवीन ठिकाणी असताना ३ वाजता फोन आला की तुमच्या कार्यालयाला आग लागली आहे. विद्युत प्रवाह दोन दिवस अगोदर आम्ही कापून घेतला होता.- **वीरेंद्र गलफट,** एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी, नांदगाव खंडेश्वर.

सोमवार ८ जून रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या कार्यालयातून धूर येत असल्याचे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले आणि खिडक्यांमधून मोठ्या ज्वाला बाहेर पडू लागल्या. घटनेची माहिती मिळताच नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीचा अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याच्या माऱ्याने आग विझविण्यास सुरुवात केली. यावेळी पंचायत समितीतील कर्मचारी व परिसरातील नागरिकांनीही मदतीचा हात दिला.आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र कार्यालयातीलविद्युत प्रवाह दोन दिवस अगोदरच मीटर काढून बंद करण्यात आला होता. आगीत आयसीडीएस अंतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांच्या नोंदवह्या, लाभार्थ्यांची माहिती, संगणक, प्रिंटर, कपाटे, खुर्चा-टेबले व इतर महत्वाचे साहित्य पूर्णपणे भस्मसात झाले. आगीमुळे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच गटविकास अधिकारी व पोलीस प्रशासन यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून अग्निशमन विभागाकडून आगीच्या नेमक्या कारणाचा तपास सुरू आहे.

# पेट्रोल-डिझेल वाहन धोरणाविरोधात विद्यार्थी वाहतूक संघटना आक्रमक

## व्हॅन भाड्यात १० टक्के वाढीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.९ अमरावती,**

पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या शालेय वाहनांबाबतच्या विविध धोरणांच्या विरोधात अंबानगरी शालेय विद्यार्थी वाहतूक संघटनेने सोमवारी आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. वाढते इंधन दर, वाहनांची देखभाल, विमा, फिटनेस, परवाने, कर आणि इतर प्रशासकीय खर्चामुळे शालेय वाहतूक व्यवसाय आर्थिकदृष्ट्या तोट्यात गेला असल्याचा दावा संघटनेने केला.संघटनेच्या वतीने जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन शालेय व्हॅनच्या भाड्यात किमान १० टक्के वाढ करण्याची मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी वाहनांचे नियमित देखभाल, विमा नूतनीकरण, फिटनेस तपासणी तसेच चालकांचे वेतन यासाठी मोठा खर्च होत असून सध्याच्या दरात सेवा देणे कठीण झाल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत शासन व प्रशासनाने वाहतूकदारांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहावे, अशी मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी लागू करण्यात आलेल्या नियमांचे स्वागत असले तरी त्यांची अंमलबजावणी करताना वाहनधारकांना आर्थिक सहाय्य किंवा सवलती देण्याची गरज असल्याचे संघटनेने नमूद केले.संघटनेचे अध्यक्ष रवींद्र गुल्हाने यांनी मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. यावेळी सागर डवरे, चरण बरडे, बाबू जाधव, प्रवीण शिंदे, विजय कुर्मी, दिनेश मडसे, राम गुल्हाने यांच्यासह अनेक व्हॅन चालक व मालक उपस्थित होते. भाडेवाढीच्या मागणीमुळे पालक, शाळा प्रशासन आणि वाहतूक व्यावसायिकांमध्ये चर्चेला उधाण आले असून प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.-

# शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तके

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती,**

विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवसापासून शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे आणि अभ्यासक्रमाच्या अध्यापनास वेळेत सुरवात व्हावी, या उद्देशाने महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता मोफत पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रमाचा शुभारंभ सोमवारी (ता. आठ) उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या उपक्रमामुळे महानगरपालिका क्षेत्रातील तब्बल ५० हजार १९१

अनुदानित व्यवस्थापनाच्या मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमाच्या यमाच्या एकूण २१० कार्यरत शाळा आहेत. या शाळांमध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत राज्य शासनामार्फत मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्यात येतो. यंदाही विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट ठेवून शिक्षण विभागाने व्यापक नियोजन केले आहे.

या पाठ्यपुस्तक वितरण मनपाचे नियोजनउपायुक्त नरेंद्र वानखडे आणि शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम करीत असून त्यांच्या नेतृत्वाखाली वितरणाचे काम वेगाने सुरू करण्यात आले आहे.

### दोन केंद्रांवरून वितरण

पाठ्यपुस्तके वितरणासाठी आठ ते ११ जून २०२६ या कालावधीत विशेष नियोजन करण्यात आले आहे. मनपा मराठी शाळा क्रमांक १३, चपराशीपुरा तसेच मनपा उर्दू शाळा क्रमांक सहा, चपराशीपुरा या केंद्रांवरून विविध माध्यमांच्या शाळांना पाठ्यपुस्तकांचे वितरण केले जाणार आहे. या चार दिवसांच्या कालावधीत संबंधित शाळांच्या प्रतिनिधींना त्यांच्या विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पाठ्यपुस्तकांचे संच वितरित करण्यात येणार आहेत.

# मोर्शी विधानसभा मतदार संघातील रोजगार हमी योजनेच्या कामांवर प्रश्नचिन्ह!

## रोजगार सेवकांच्या आयडी-पासवर्ड गैरवापर प्रकरणाची होणार चौकशी !

### युजर ID गैरवापर निष्पन्न झाल्यास फौजदारी कारवाई करण्याचे प्रशासनाचे निर्देश !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ मोर्शी-** मोर्शी विधानसभा मतदार संघातील पांदण रस्त्यांच्या कामांमध्ये बोगस मस्टर, अपूर्ण कामे आणि निधीच्या गैरवापराबाबत गंभीर आरोप होत असताना या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याच्या मागणीला विरोध होत असल्याने पांदण रस्त्यांच्या कामाबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मोर्शी वरूड तालुक्यातील विविध गावांमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत मातोश्री पाणंद रस्ते योजनेतून करण्यात आलेल्या कामांमध्ये हजारो मजुरांच्या नावावर बोगस हजेरीपत्रके (मस्टर) भरल्याचा आरोप करण्यात येत आहे. या आरोपांची सखोल चौकशी व्हावी, दोषींवर कारवाई व्हावी अशी शेतकरी व नागरिकांची मागणी होत असतांनाच मोर्शी विधानसभा मतदार संघातील ग्रामरोजगार सहाय्यकांच्या युजर खऊ आणि पासवर्ड चा कथित गैरवापर होत असल्याच्या तक्रारीची प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनातर्फे देण्यात आले आहेत. रोजगार सहाय्यक संघटना वरूड यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकाऱ्यांनी



तहसीलदार व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना पत्र पाठवून चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.प्राप्त तक्रारीनुसार, गेल्या काही महिन्यांपासून काही अज्ञात व्यक्तींकडून ग्रामरोजगार सहाय्यकांच्या णीशी खऊ व झर्ििीव चा वापर करून मजुरांच्या उपस्थिती नोंदी करण्यात येत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे रोजगार हमी योजनेतील कामांच्या नोंदींबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.प्रशासनाने सर्व ग्रामरोजगार सहाय्यकांना तत्काळ पासवर्ड बदलण्याबाबत सूचना देण्यास सांगितले असून या गंभीर प्रकरणाची उप जिल्हाधिकारी रोहयो यांनी सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध आवश्यक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच चौकशीदरम्यान युजर खऊ चा गैरवापर झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचाही इशारा प्रशासनाने दिला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे मोर्शी विधानसभा मतदार संघातील रोजगार हमी योजनेच्या कामांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून चौकशी अहवालाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अवैध शस्त्र तस्करीचे केंद्र? शस्त्रांसह कुख्यात पाच आरोपी गजाआड; शस्त्र विक्री, जबरी चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अकोला :** अकोला जिल्हा शस्त्र तस्करीचे केंद्र होत आहे. आंतरजिल्हा आरोपी अकोल्यात राहून शस्त्र विक्रीचा प्रकार करीत असल्याचा धक्कादायक प्रकार पोलीस कारवाईत समोर आला. तस्करी व अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात अकोला पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत धडक मोहीम सुरू केली. विविध पोलीस ठाण्यांतर्गत देशी पिस्तूल व इतर शस्त्रे जप्त करून पाच आरोपींना गजाआड केले.

'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत कारवाईचे सत्र

'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत पोलिसांनी आरोपी सुरज सोनटक्के (रा. चिखलवाडी, नांदेड) याला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. स्थानिक गुन्हे शाखेने रामदासपेठ आणि सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यांतर्गत सलग कारवाई करून आणखी दोन अग्निशस्त्रे जप्त केली. रामदासपेठ हद्दीतील मनपा शाळा क्र. ०७ जवळील पाण्याच्या टाकीसमोर केलेल्या कारवाईत आरोपी सचिन मुकुंद बलखंडे (वय २९ वर्षे, रा. अकोट फाईल, अकोला) याच्याकडून एक लोखंडी देशी बनावटीचा कट्टा आणि एक जिवंत काडतुस असा एकूण ४१ हजारांचे शस्त्र जप्त केले.

रामदासपेठ पोलीस ठाण्यात कलम ३, २५ आर्म क्ट अन्वये गुन्हा दाखल केला. दुसऱ्या एका कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेने लहान उमरी परिसरातुन आरोपी आदेश आठवले (वय २५ वर्षे, रा.अकोला) याच्याकडून एक लोखंडी देशी बनावटीचा कट्टा जप्त करून सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# जिल्ह्यात ९० टक्के मतदार मॅपिंग पूर्ण

## दर्यापूर विधानसभा मतदारसंघ सर्वात पुढे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती,=** जिल्ह्यातील मतदारयाद्यांचे अचूक सक्षमीकरण आणि मतदार मॅपिंग मोहिमेने वेग घेतला आहे. ६ जून २०२६ पर्यंत जिल्ह्यातील ८ विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ८९.७२ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. यात दर्यापूर विधानसभा मतदार संघ ९५.६९ टक्क्यांसह सर्वात पुढे आहे. जिल्ह्यातील एकूण ८ विधानसभा मतदारसंघांपैकी दर्यापूर मतदारसंघ ९५.६९ टक्के मॅपिंगसह जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आहे. त्यापाठोपाठ धामणगाव रेल्वे ९४.८८ टक्केसह दुसऱ्या स्थानावर आहे. अमरावती विधानसभा



मतदारसंघही ८०.०६ टक्के मॅपिंगसह प्रगती करीत आहे. जिल्ह्यातील एकूण २५ लाख ५८ हजार ३६४ मतदारांपैकी २२ लाख ९५ हजार ३१९ मतदार मॅपिंग पूर्ण झाले आहेत. उर्वरित २ लाख ६३ हजार ४५ मतदारांचे मॅपिंग झालेले नाही. नगरपालिका क्षेत्रात सरासरी ८५.१९ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. यात भातकुली नगरपालिका ९५.५७ टक्केसह सर्वात आघाडीवर आहे. जिल्ह्यातील मॅपिंगच्या प्रक्रियेत लक्षणीय वाढ झालेली आहे. १७ मार्च रोजी जिल्ह्याचे मॅपिंग ४६.३७ टक्के होते. यात आता जिल्हा आता ८९.७२ टक्केवर पोहोचला आहे. यामध्ये सर्वाधिक प्रगती अमरावती मतदारसंघात झाली असून, तिथली टक्केवारी २८.०३ टक्क्यांवरून ८०.०६ टक्के वाढ झाली आहे.

जिल्ह्यातील उर्वरित २ लाख ६३ हजार ४५ मतदारांचे मॅपिंग आणि त्रुटी दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येत आहे. मतदारांनीही मॅपिंगच्या कार्यात सहकार्य करावे, बीएलओंकडून मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.-

# एक्साईजच्या महिला कर्मचाऱ्याचे मानसिक छळ प्रकरण

## पीडित कर्मचारी महिलेला पालकमंत्र्यांनी दिली हिंमत

### थेट उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना केला फोन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती** राज्य उत्पादन शुल्क विभागात कार्यरत चालक महिलेने कार्यालयातील एका दुय्यम निरीक्षक सतत मानसिक त्रास व छळ करीत असल्याची तक्रार संबंधित अधिकाऱ्यासह राजापेठ पोलीस स्टेशनमध्ये दिली होती. परंतु दोन महिने झाले तरी कुठलीच कारवाई न झाल्याने सोमावारी संबंधित कर्मचारी महिलेने पालकमंत्री बावनकुळे यांची भेट घेऊन सर्व प्रकार सांगितला. प्रकरणाची गंभीर दखल घेत त्यांनी तत्काळ उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना फोन करून युवतीचे बोलणे करून दिले. राजापेठ अंडरपास पुलालगत महानगरपालिकेच्या बाजार परवाना विभाग कार्यालयात जिल्ह्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय गेल्या काही महिन्यांपासून आहे. कार्यालयातील अधिक्षकांच्या

सरकारी वाहनावर एक महिला चालक कार्यरत आहेत. परंतु काही महिन्यापासून दुय्यम निरीक्षक महिला चालकाला चारचौघात उद्धटपणे बोलणे तसेच सरकारी वाहनाचे मेंटनन्स आणि अलायमेंट वेळोवेळी करण्याचे सांगत तिचा छळ करणे आणि सरकारी कामाव्यतिरिक्त



अन्य काम सांगत असल्यामुळे महिला कर्मचारी त्रस्त झाली होती. दररोजच्या त्रासाला कंटाळून महिलेने राज्य उत्पादन अधीक्षक यांच्याकडे तक्रार दिली होती. परंतु काहीच झाले नाही. त्यामुळे एप्रिल महिन्यात राजापेठ ठाण्यात तक्रार दिली. परंतु राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल न करता महिलेची तक्रार चौकशीत ठेवली. ती तक्रार अद्याप धुळ खात आहे. संबंधित अधिकाऱ्याविरुध्दखात्यामार्फत कुठलीच कारवाई झाली नाही आणि पोलिसांनी सुध्दा न्याय दिला नाही. सोमवारी शहरात पालकमंत्री बावनकुळे असल्याची माहिती मिळताच कर्मचारी महिला दुपारी हॉटेल ग्रॅण्ड महफिल ईनमध्ये पोहचली आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन सर्व प्रकार सांगितला. यांनी थेट उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना फोन लावला इण्यासाठी आणि सर्व प्रकार सांगितला, तसेच फोनवर पीडितेचे बोलणे करून दिले. त्यावेळी पीडितेने पोलिसांना ऑडिओ क्लिप्स, पेन ड्राइव्ह आणि इतर कागदपत्रांचे सबळ पुरावे दिले असल्याचे सांगितले. मात्र कोणीच कारवाई केली नाही असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना सांगितले.

# ‘मी भाजपाची प्रामाणिक, निष्ठावान कार्यकर्ती’

# राष्ट्रवादी प्रवेशाच्या चर्चांना नवनीत राणांचा पूर्णविराम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि ,९ अमरावती :** माजी खासदार नवनीत राणा यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका फेसबुक पोस्टमुळे राज्यातील राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना नवे वळण मिळाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून राज्यसभेवर जाणार असल्याच्या चर्चांवर त्यांनी स्पष्ट भूमिका मांडत आपण भारतीय जनता पक्षाच्या विचारसरणीशी कटिबद्ध असल्याचे जाहीर केले आहे.फेसबुक पोस्टमध्ये नवनीत राणा यांनी, मी भाजपाची प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्ती आहे. कोणत्याही पदासाठी किंवा राजकीय संधीसाठी मी माझी विचारधारा बदलणार नाही. भविष्यातही भाजपचे कार्य प्रामाणिकपणे करत राहीन, असे स्पष्टपणे नमूद केले. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या त्यांच्या संभाव्य पक्षांतराच्या



चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.राज्यसभेच्या उमेदवारीसंदर्भात त्यांनी सुनीत्रा पवार आणि पार्थ पवार यांचे आभार मानले. दोघांनीही त्यांना राज्यसभेवर पाठविण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची अट असल्याचे समोर आले होते. ही अट स्वीकारणे शक्य नसल्याने आपण तो प्रस्ताव नम्रपणे नाकारल्याचे त्यांनी सूचित केले.सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यसभेच्या जागेसंदर्भात प्रयत्न करताना नवनीत राणा यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. फडणवीस यांच्या सूचनेनुसार त्यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन संबंधित राज्यसभा जागा भाजपला देण्याबाबत विनंती केली होती. मात्र, विविध राजकीय कारणांमुळे तो पर्याय शक्य झाला नाही.सदर राज्यसभा जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडे असल्याने ती भाजपला सोडण्यास नकार देण्यात आला. त्यानंतर राष्ट्रवादीत प्रवेश केल्यास उमेदवारी देण्याचा प्रस्ताव समोर आल्याचे सांगितले जाते. मात्र, पक्षांतर करण्याऐवजी आपल्या राजकीय भूमिकेशी प्रामाणिक राहण्याचा निर्णय घेत नवनीत राणा यांनी भाजपसोबतच राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.या फेसबुक पोस्टनंतर राज्यसभा निवडणूक आणि भविष्यातील राजकीय समीकरणांबाबतच्या चर्चांना अधिक वेग आला असून, नवनीत राणा यांच्या भूमिकेकडे राज्याच्या राजकारणाचे लक्ष लागले आहे.


# सायबर गुन्हेगारी हे पोलिसांसमोरील सर्वात मोठे आव्हान

## – पोलिस महासंचालक सदानंद दाते

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती** पोलिस दलात रुजू झाल्यानंतर सहाय्यक पोलिस अधीक्षक म्हणून अमरावतीमधील वलगाव पोलिस ठाण्यात पूर्ण केला. त्या तीन महिन्यांत अमरावतीत जे शिकायला सदानंद दाते मिळाले, ते त्यानंतर अन्यत्र कुठेही शिकायला मिळाले नाही. त्यानंतर अप्पर पोलिस अधीक्षक म्हणूनही येथे सेवा देण्याची संधी मिळाली. त्यामुळे अमरावतीशी अनेक भावनिक आठवणी जोडल्या गेल्या आहेत, असे भावनिक उद्गार पोलिस महासंचालक सदानंद दाते यांनी काढले.

सोमवारी जिल्हा दौऱ्यावर असताना त्यांनी पत्रकारांशी अनौपचारिक संवाद साधताना सांगितले की, आज सकाळीही विद्यापीठ परिसरात सुमारे एक तास पायी फेरफटका मारला. याचवेळी मात्र शिवटेकडीवर (त्यावेळची मालटेकडी) जायचे राहून गेले, पण पुढील अमरावती भेटीत तेथे नक्कीच जाणार अशी इच्छा त्यांनी वर्तवली.अलीकडच्या काळात सायबर गुन्हेगारी हे पोलिसांसमोरील सर्वात मोठे आव्हान बनले आहे. या पार्श्वभूमीवर ’महासायबर’ हा नवीन विभाग लवकरच सुरू करण्यात येणार असून त्यासाठी अत्याधुनिक ऑनलाइन टुल्स विकसित करण्यात आले आहेत. येत्या १६, १७ जूनपासून



हीऑनलाईन टूल्स राज्यातील सर्व शहर व जिल्हा सायबर पोलिस ठाण्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामुळे सायबर गुन्हे रोखणे आणि गुन्हेगारांचा माग काढणे अधिक प्रभावी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.पोलीस कर्मचाऱ्यांवरील वाढता कामाचा ताण लक्षात घेऊन ’ऑल हँड्स मिट’ ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत वरिष्ठ अधिकारी दर महिन्याला अंमलदारांसोबत थेट साधून त्यांच्या समस्या जाणून घेतील, त्यांना असलेल्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करतील आणि त्यांच्याकडून सूचना देखील स्वीकारतील. संवाद व अंमली पदार्थमुक्त वातावरण निर्मितीसाठी राज्यातील १ हजार २०० महाविद्यालयीन कॅम्पसमध्ये – पोलीस, एएनटिएफ (अंमली पदार्थ विरोधी पथक) – महाविद्यालय प्रशासन संयुक्तपणे – आता प्रभावीपणे काम करणार आहे. दरम्यान यावेळी विशेष पोलिस महानिरीक्षक महेश पाटील व पोलिस आयुक्त राकेश ओला प्रामुख्याने उपस्थित होते.

# रेल्वे उड्डाणपूल पाडकाम अंतिम टप्प्यात

## नव्या पुलाच्या उभारणीची प्रतीक्षा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला राजकमल चौकाशी जोडणारा रेल्वे उड्डाणपूल पाडण्याचे काम आता अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. पुलावरील बहुतांश भाग हटविण्यात आला असून रेल्वे रुळांवरील गर्डर उघडे झाले आहेत. हे गर्डर रेल्वेच्या उच्चदाब वीजवाहिन्यांवर असल्याने त्यांचे सुरक्षितरीत्या विसर्जन करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे.सध्या रात्री १२ ते पहाटे ५ वाजेदरम्यान ब्लॉक घेऊन पाडकामाची प्रक्रिया सुरू आहे. उर्वरित गर्डर हटविल्यानंतर पुलाचे संपूर्ण पाडकाम पूर्ण होणार असून त्याठिकाणी नवीन आणि अधिक सुरक्षित उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे.सदर पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरत असल्याने ऑगस्ट २०२५ मध्ये तो बंद करण्यात आला होता. तेव्हापासून नागरिकांना राजकमल चौक गाठण्यासाठी दीड ते दोन किलोमीटरचा अतिरिक्त वळसा घालावा लागत आहे. त्यामुळे वाहनचालक आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.पुलाचे पाडकाम अंतिम टप्प्यात पोहोचल्याने आता नव्या पुलाच्या बांधकामाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहरवासीयांचे लक्ष आता नव्या उड्डाणपुलाच्या उभारणीकडे लागले आहे.

# मनपा क्षेत्रातील तब्बल ३० जीर्ण व अति धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.९अमरावती**

पावसाळा तोंडावर आला असताना शहरातील धोकादायक आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मनपा क्षेत्रातील तब्बल ३० जीर्ण व अतिधोकादायक इमारतींवर महानगरपालिका लवकरच जमीनदोस्त करण्याची कारवाई करणार आहे. या सर्व इमारतींच्या मालकांना नोटिसा बजावण्यात आल्या असून प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी तयारी सुरू केली आहे.



महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार शहरातील अनेक इमारती अत्यंत धोकादायक अवस्थेत आहे. अशा इमारतींमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे.त्यामुळे या इमारतींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी नगरसेवक व नागरिकांनी केली आहे. शहरातील पाच झोनमध्ये एकूण ३० जीर्ण इमारतींची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये झोन क्रमांक २ मध्ये १४ तर भाजीबाजार झोन क्रमांक ५ मध्ये १५ अत्यंत धोकादायक इमारती आहेत. झोन क्रमांक १ मध्ये एक इमारत ’सी-१’ अर्थात अतिधोकादायक श्रेणीत आहे. झोन ३ आणि ४ मध्ये सध्या अशा इमारतींची नोंद नाही. विशेष म्हणजे भाजीबाजार परिसरातील अनेक इमारती १०० वर्षांहून अधिक जुन्या आहेत. या इमारतींची अवस्था अत्यंत खराब झाली असून त्या कोणत्याही क्षणी कोसळू शकतात. त्यामुळे या परिसरातील १५ इमारतींना ’सी-१’ श्रेणीत समाविष्ट करण्यात आले आहे. पावसाळ्यापूर्वी त्यांच्यावर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उल्लेखनीय असे की प्रभात टॉकीज परिसरातील राजेंद्र लॉजच्या इमारतीत झालेल्या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला होता. त्याघटनेनंतर जीर्ण इमारतींच्या प्रश्नाकडे गांभीर्यान पाहिले आहे. त्यामुळे यंदा पावसाळ्यापूर्वी सर्व धोकादायक इमारतींवर तातडीने कारवाई करून संभाव्य जीवितहानी टळावी यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्न करत आहे.

# नवनीत राणा शिंदे गटात आल्यास स्वागत; राष्ट्रवादीने संधी गमावली - बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.८ अमरावती** अमरावती येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी खासदार नवनीत राणा यांच्या संभाव्य राज्यसभा उमेदवारीबाबत प्रतिक्रिया दिली. नवनीत राणा या मूळच्या काँग्रेस-राष्ट्रवादी विचारसरणीच्या असून त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्यावर निवडून आल्या होत्या, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना राज्यसभेची उमेदवारी देण्याची संधी सोडायला नको होती, असे मतही त्यांनी व्यक्त केले.यावेळी बच्चू कडू म्हणाले की, नवनीत राणा शिंदे गटात येण्यास तयार असतील तर त्यांचे स्वागत आहे. चांगले व्यक्तिमत्त्व आणि जनाधार असलेल्या व्यक्तींना सोबत घेण्यास आम्ही तयार आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.राज्यातील सत्तासमीकरणांवर भाष्य करताना त्यांनी मुख्यमंत्री पदासाठी एकनाथ शिंदे यांनाच संधी मिळावी, अशी भूमिका पुन्हा मांडली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावेत यासाठी आम्ही काहीही करू, असे ठाम विधान बच्चू कडू यांनी केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय चर्चांना नवे वळण मिळाले आहे.-



# उंबरखेड परिसरात वादळी वाऱ्याचा कहर..

## संत्रा बागा, गोठे व वीज यंत्रणेचे मोठे नुकसान; शेतकरी संकटात

**.विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९तिवसा** मृग नक्षत्र सुरू झाल्यानंतरही उष्णतेची तीव्रता कायम असल्याने शेतकरी व नागरिक हैराण झालेले असतानाच तिवसा तालुक्यातील उंबरखेड परिसरात सोमवारी सायंकाळी अचानक आलेल्या जोरदार वादळी वाऱ्याने मोठ्या प्रमाणात हाहाकार माजविला. या वादळामुळे अनेक शेतकऱ्यांच्या संत्रा बागा, गोठे, घरे तसेच वीज वितरण यंत्रणेचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. अचानक आलेल्या प्रचंड वेगाच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तर काही शेतकऱ्यांच्या शेतातील संरचना पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या. शेतकरी सुनील कळंबे यांच्या शेतातील बैल व गाईंसाठी उभारलेला गोठा वादळात पूर्णतः





उडून गेला. त्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

तसेच गजानन कळंबे यांच्या संत्रा बागेतील सुमारे २५ झाडे जमिनदोस्त झाली असून अनेक झाडे मुळासकट उन्मळून पडली आहेत.

उषाताई जानराव कळंबे यांच्या शेतातील तब्बल ५० संत्र्याच्या झाडांचे नुकसान झाले आहे. तर पवन मनोहर कळंबे यांच्या बागेतील ३५ झाडे वादळी वाऱ्यामुळे पडून मोठी हानी झाली आहे.

वादळाचा फटका महावितरणच्या यंत्रणेलाही बसला असून अनेक ठिकाणी विद्युत खांबांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे परिसरातील वीजपुरवठा काही काळ विस्कळीत झाला होता. अरविंद कळंबे यांच्या शेतातील गुराढोरांसाठी असलेला गोठा देखील वाऱ्याच्या तडाख्यात पूर्णतः उडून गेला. तसेच संजय मुंडे यांच्या शेतातील गोठ्याचेही मोठे नुकसान झाले आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देऊन पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे. महसूल व कृषी विभागाने त्वरित पाहणी करून नुकसानग्रस्तांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# ‘वेलकम पॉईंट’ बनला गुन्हेगारी अन् वाहतूक कोंडीचा अड्डा; अर्जुन नगरच्या नागरिकांचा प्रशासनाला आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** शहराचे मुख्य प्रवेशद्वार असलेला ’वेलकम पॉईंट’ परिसर सध्या अत्यंत गंभीर, संवेदनशील आणि भयानक परिस्थितीतून जात असून, तो गुन्हेगारी, अराजकता आणि वाहतूक कोंडीचा मुख्य केंद्रबिंदू बनला आहे. या वाढत्या त्रासाला कंटाळून आज अर्जुन नगर परिसरातील शेकडो नागरिकांनी एकत्र येत अमरावतीच्या जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी (ठढज) यांना एक जाहीर निवेदन दिले. हे निवेदन सादर करताना नगरसेवक गुड्डू धर्माळे, माजी नगरसेवक गोपाल धर्माळे, प्रमोद खंडारे, विरेंद्र भट, राहुल इंगळे, विशाल पवार, विशाल पाचघरे, महेश तराळ, सचिन निस्ताने, निलेश खेडकर, नितिन धर्माळे, नवनीत पाचघरे, अभिजीत तायवाडे, स्वप्नील देशमुख, आदेश मैदानकर, प्रणव पुसतकर, भावेश मैदानकर, मोहित मैदानकर व अमोल साबळे



यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.नागरिकांनी निवेदनात प्रशासनाचे लक्ष वेधताना सांगितले की, या परिसरात खाजगी ट्रॅव्हल्स चालक रस्त्याच्या मध्यभागी अनधिकृतपणे बसेस उभ्या करून प्रवाशांची वाट पाहत थांबतात, ज्यामुळे पाठीमागील संपूर्ण वाहतूक ठप्प होते. या वाहतूक कोंडीची सर्वात अमानुष बाब म्हणजे, गंभीर रुग्णांना घेऊन जाणाऱ्या आपत्कालीन रुग्णवाहिका देखील या कोंडीत २० ते २५ मिनिटे अडकून पडत आहेत आणि सतत सायरन वाजवूनही मुजोर बस चालक गाड्या बाजूला करत नाहीत. या बेशिस्त पार्किंगमुळे येथे रोज लहान-मोठे जीवघेणे अपघात घडत असून हा प्रश्न केवळ वाहतुकीचा राहिलेला नसून, सर्वसामान्य अमरावतीकरांच्या सुरक्षेचा आणि जिवाचा बनला आहे.वाहतूक कोंडीच्या या समस्येसोबतच आता या संपूर्ण परिसराला अवैध आणि अनैतिक धंद्यांचा मोठा विळखा बसला आहे. परिसरात सर्रासपणे अंमली पदार्थांची (ड्रग्ज) विक्री, देहविक्रीचे सक्रिय जाळे आणि राजरोसपणे अश्लील चाळे चालत असल्याचे धक्कादायक चित्र आहे. यामुळे परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे खाजगी बसेसचे अनधिकृत थांबे तातडीने हटवून शहराबाहेर स्वतंत्र पिकअप पॉईंट निश्चित करण्यात यावा, तसेच परिसरातील अवैध धंदे व गुन्हेगारीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.येत्या ७ दिवसांत या अवैध वाहतुकीवर, मुजोर ट्रॅव्हल्स चालकांवर आणि सुरू असलेल्या सर्व अवैध धंद्यांवर ठोस तोडगा काढून हा परिसर गुन्हेगारीमुक्त करण्यात यावा, अशी स्पष्ट भूमिका रहिवाशांनी घेतली आहे. प्रशासनाने या कालावधीत कारवाई न केल्यास स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी आणि विविध संघटनांच्या वतीने प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, ज्याची संपूर्ण नैतिक व कायदेशीर जबाबदारी प्रशासनाची राहील, असा थेट इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.